# वाहन चालक

वेळ : 2 तास | एकूण प्रश्न : 160 | एकूण गुण : 160

1. सुरक्षिततेचा अर्थ
   (A) स्वतःच्या आणि समाजाच्या सुरक्षिततेचे शास्त्र
   (B) अपघात टाळण्याची कला व योग्य कृती
   (C) अभियांत्रिकी नियंत्रणाचे मार्ग
   (D) वरील (A), (B), (C) सर्व

2. अपघात होण्याची मनुष्याकडून घडून येणारी संभाव्य कारणे
   (A) अज्ञान व निष्काळजीपणा
   (B) भीती, काळजी, मानसिक ताण, कामात दुर्लक्ष करणे
   (C) फाजील आत्मविश्वास, जाणीव शून्यता, बेफिकीरपणा
   (D) वरील (A), (B), (C) सर्व

3. इंजिनाच्या एग्झॉस्ट गॅसेस मध्ये कोणता वायु असतो ?
   (A) प्राणवायु
   (B) कार्बन मोनोक्साईड
   (C) कार्बन डायऑक्साईड
   (D) पर्याय (B) व (C) दोन्हीही

4. खालीलपैकी कोणती कृती करु नये ?
   (A) ॲसिडला डायरेक्ट स्पर्श करु नये
   (B) उर्ध्वपतन केलेले पाणी ॲसिडमध्ये ओतू नये
   (C) उर्ध्वपतन केलेल्या पाण्यात ॲसिड ओतावे
   (D) पर्याय (A) व (B) दोन्ही करु नये

5. प्रथमोपचार पेटीतील आवश्यक साहित्य
   (A) डबल ओपन एन्ड रेंच
   (B) ट्युबलर स्पॅनर
   (C) बेन्झॉइन, आयोडिन किंवा मर्क्युरी क्रोमची बाटली
   (D) वरील (A), (B), (C) सर्व

6. गरम वस्तुच्या पृष्टास स्पर्श होवून अथवा गरम द्रव पदार्थ किंवा ज्वाळापासून भाजल्यास
   (A) आयोडीन लावावे
   (B) जखमेवर बॅन्डेज बांधावे
   (C) (A) व (B) दोन्ही करावे
   (D) भाजलेल्या भागावर थंड पाणी ओतावे. भाजलेला भाग स्पिरीटने स्वच्छ धूवून त्यावर जेन्शन व्हायोलेट लावावे

7. अग्निशामकाच्या वरील बाजूस अथवा साईडला निळ्या रंगाची पट्टी लावलेली असेल तर
   (A) तो फोम टाईप अग्निशामक आहे
   (B) तो सोडा ॲसिड टाईप अग्निशामक आहे
   (C) तो कार्बन टेट्राक्लोराईड टाईप अग्निशामक आहे
   (D) वरील (A), (B), (C) नाही

SPACE FOR ROUGH WORK

8. पार्टच्या पृष्ठभागापासून खोलवर असणारे कमी टॉर्क लागणारे नटबोल्ट काढण्यासाठी कोणता स्पॅनर वापराल ?
(A) रिंग स्पॅनर
(B) ट्युबलर स्पॅनर
(C) डबल ओपन एन्ड रेंच
(D) स्टिलसन पाईप रेंच

9. पेट्रोल इंजिनचे इग्निशन टायमिंग चेक करण्यासाठी __________ वापरण्यात येते.
(A) स्पार्क प्लग टेस्टर
(B) कॉम्प्रेशन गेज
(C) टायमिंग लाइट गन
(D) टेकॉमिटर

10. बॅटरी ॲसिडची स्पेसिफिक ग्रॅव्हिटी मोजण्यासाठी __________ चा उपयोग होतो.
(A) बॅटरी सेल टेस्टर
(B) हैड्रॉमिटर
(C) ॲसिड मिटर
(D) मायक्रोमिटर

11. टायर प्रेशर गेज मोजण्यासाठी डायल टाईप गेज वापरण्यात आल्यास त्याची कॅपॅसिटी खालीलप्रमाणे असते.
(A) 0 पौंड प्रति स्क्वेअर इंच ते 10 पौंड प्रति स्क्वेअर इंच
(B) 0 पौंड प्रति स्क्वेअर इंच ते 65 पौंड प्रति स्क्वेअर इंच
(C) 0 पौंड प्रति स्क्वेअर इंच ते 150 पौंड प्रति स्क्वेअर इंच
(D) 0 पौंड प्रति स्क्वेअर इंच ते 80 पौंड प्रति स्क्वेअर इंच

12. वजन वाहून नेण्याच्या क्षमतेनुसार मोटार गाड्यांचे प्रकार पडतात त्यानुसार ज़ड वाहन (एच. एम. व्ही.) या वाहनाची वजन वाहुन नेण्याची क्षमता किती असते ?
(A) 4000 कि.ग्रॅ. किंवा त्यापेक्षा कमी
(B) 7500 कि.ग्रॅ. किंवा त्यापेक्षा कमी
(C) 11000 कि.ग्रॅ. किंवा त्यापेक्षा जास्त
(D) 11000 कि.ग्रॅ. किंवा त्यापेक्षा कमी

13. राष्ट्राच्या महत्वाच्या व्यक्तिसाठी व अनेक सुख सोईने युक्त अशा ________ प्रकारच्या गाड्या वापरतात.
(A) कार
(B) पिकअप व्हॅन
(C) कन्व्हर्टेबल टॉप
(D) लिमोझिन

14. ॲम्बॅसिडर मार्क I, II, III, IV नोव्हा या प्रकारच्या गाड्या कोणती कंपनी तयार करते ?
(A) महिंद्रा ॲण्ड महिंद्रा (मुंबई)
(B) टाटा/टेल्को (पुणे)
(C) हिंदुस्तान मोटार्स (कोलकत्ता)
(D) प्रिमियर ऑटोमोबाइल (मुंबई)

15. भारतातील परदेशी बनावटीच्या मोटारी कॉम्बी ॲक्टिव्हा, लाऊरा बनविणारी कंपनी कोणती ?
(A) जनरल मोटर्स (मुंबई)
(B) होंडा सिएट (मुंबई)
(C) स्कोडा (औरंगाबाद)
(D) वरील (A), (B), (C) सर्व कंपनी

16. ज्या दोन पार्टसचे फिटींग एअर टाईट किंवा लिकप्रूफ जॉईट तयार होणे आवश्यक असते त्या जॉईंटसाठी __________ वापरण्यात येते.
(A) नटबोल्ट
(B) वेल्डिंग
(C) गॅस्केट किंवा सील
(D) रिव्हेटिंग

17. ऑईल पेपर हे
(A) ऑईल आहे
(B) ग्रीस आहे
(C) गॅस्केट मटेरियल आहे
(D) यापैकी नाही

18. ज्याचे आतील बाजूने थ्रेड पाडलेले असतात त्यास ________ म्हणतात.
(A) बोल्ट
(B) नट
(C) नटबोल्ट
(D) यापैकी नाही

19. गाडीची बॉडी व इतर भाग यांचे वजन पेलून धरण्यासाठी आणि गाडी ओढून नेण्यासाठी तसेच गाडी सुरक्षित चालविण्यासाठी ______ ची आवश्यकता असते.
(A) आर्टिलरी व्हील
(B) स्टीअरींग
(C) ब्रेक्स
(D) यापैकी नाही

**SPACE FOR ROUGH WORK**

20. वेगवेगळ्या कारणांमुळे प्रत्येक टायरची कमी जास्त प्रमाणात झीज होते. गाडीच्या सर्व टायर ट्रेडची झीज सारख्या प्रमाणात व्हावी यासाठी टायरचे रोटेशन केले जाते. रोटेशन करण्यास रनिंग मर्यादा अंदाजे खालीलप्रमाणे असते.

(A) 5000 किमी झाले नंतर लगेच
(B) 5000 किमी ते 7000 किमी
(C) 8000 किमी ते 10000 किमी
(D) 10000 किमी ते 13000 किमी

21. टायर इन्फ्लेशन म्हणजे

(A) टायर रोटेशन करणे
(B) टायरमध्ये हवा भरणे
(C) टायरचे ट्रेड, ट्रेड पॅटर्न चेक करणे
(D) यापैकी नाही

22. टायर ट्युब मधील हवेचा दाब तपासून घेण्याचा कालावधी अंदाजे पुढीलप्रमाणे

(A) दर 8 दिवसातून एकदा
(B) दर 30 दिवसातून एकदा
(C) दर 45 दिवसातून एकदा
(D) यापैकी नाही

23. इलेक्ट्रीक पॉवर स्टीअरींग (ईपीएस) असल्यास खालील फायदा होतो.

(A) इंधनाची बचत होते
(B) इंधनाची बचत होत नाही
(C) सुरक्षितता वाढते
(D) पर्याय (A) व (C) दोन्हीही

24. इंजिन मधून येणारे गरम पाणी थंड करण्यासाठी गाडीमध्ये बसविण्यात येणारा पार्ट म्हणजे

(A) कार्ब्युरेटर
(B) रेडिएटर
(C) एअरफिल्टर
(D) यापैकी नाही

25. गाडीमध्ये वापरण्यात येत असलेली बॅटरी चार्ज करण्यासाठी एसी जनरेटिंग मशीन बसविलेले असते त्यास __________ म्हणतात.

(A) ॲसिलेटर
(B) अल्टरनेटर
(C) कपॅसिटर
(D) आर्मेचर

26. एखाद्या गल्लीतून आपण आपले वाहन मुख्य रस्त्यावर आणत असाल तर

(A) मुख्य रस्त्यावर पोहोचण्यापूर्वी गाडी थांबवा
(B) खुप रहदारी असेल तरच गाडी थांबवा
(C) शक्य असल्यास गाडी थांबवा
(D) वेगाने पुढे जा

27. चौक पार करतांना रहदारी नियंत्रक दिवा पिवळा प्रकाशत असेल तर

(A) सुरक्षिततेची शक्यता असल्यास थांबा
(B) वेग कमी करावा
(C) तोच वेग कायम ठेवा
(D) वेग वाढवून पुढे निघुन जा

28. आपणास जर आपले वाहन वळवायचे असेल तर आपण किती मीटर आधी इशारा देणे आवश्यक आहे ?

(A) 20 मीटर
(B) वळताना
(C) 30 मीटर
(D) 60 मीटर

29. रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनाचे दिवे प्रखरपणे लावलेले आहेत अशा वाहनाचा वाहनचालक

(A) अयोग्य सवयीचा आहे
(B) सुरक्षित वाहन चालविणारा आहे
(C) नियमांचे पालन करणारा आहे
(D) हुशार आहे

SPACE FOR ROUGH WORK

30. आपण चालवित असणाऱ्या वाहनास अपघात होवून दोन व्यक्ति जखमी झाल्या तर

(A) पोलिस स्टेशनला कळविण्याची गरज नाही

(B) जवळील पोलिस स्टेशनला कळवा व त्या व्यक्तिंना दवाखान्यात न्या

(C) पोलिस स्टेशनला कळविण्याची गरज नाही. परंतु त्या व्यक्तिंना दवाखान्यात न्या

(D) पलायन करा

31. आपण अशा चौकात येत आहोत की, जेथे कोणत्याही प्रकारचा सूचनादर्शक दिवा नाही. आपल्या मोटार वाहनासमोर अनेक पादचारी रस्ता ओलांडत आहेत. अशा परिस्थितीत

(A) आपल्या वाहनाचा वेग कमी न करता चौक ओलांडण चालू ठवाव

(B) आपल्या वाहनाचा वेग कमी करावा व काळजीपूर्वक जावे

(C) आपले वाहन थांबवावे आणि इतर पादचाऱ्यांना रस्ता ओलांडू द्यावा

(D) भरधाव वेगाने निघून जावे

32. समांतर उभ्या केलेल्या वाहनातून तुमचे वाहन रस्त्यावर काढताना

(A) पटकन वाहन रस्त्यावर घ्या

(B) हॉर्न वाजवा व नियंत्रण ठेवून वाहन सावकाश बाहेर काढा

(C) जवळपास अपघात होण्याइतपत रहदारी नसल्यास काळजीपूर्वक पुढे जा

(D) इतर रहदारीला इशारा द्या व नंतर वाहन रस्त्यावर आणा

33. गल्लीतून एखादे वाहन रस्त्यावर येत असल्याचे आढळल्यास रस्त्यावरून प्रथम जाण्याचा हक्क कोणाचा आहे ?

(A) मुख्य रस्त्यावरील वाहनाचा
(B) गल्लीतून मुख्य रस्त्यावर येणाऱ्या वाहनाचा
(C) दोघांचाही नाही
(D) जो प्रथम असेल त्याचा

34. वाहनाच्या पाठीमागील दृष्य दिसण्याकरिता लावलेल्या आरशाला इतरकोणतीही वस्तू जोडणे अथवा लोंबकळत ठेवणे हे

(A) आवश्यक आहे
(B) कायदेशीर नाही
(C) ती वस्तु साधारण किती मोठी आहे यावर अवलंबून आहे
(D) वाहन चालकाला अडथळा येत नसल्यास हरकत नाही

35. मुसळधार पाऊस अथवा दवामुळे वाहनाची पुढली काच व खिडक्या धुसर झाल्या असल्यास तुम्ही

(A) आपल्या वाहनाचा वेग वाढवावा

(B) वाहनाची गती कमी करून वाहन चालु ठेवा

(C) वाहनाची पुढची काच व खिडक्यांची तावदाने स्वच्छ करेपर्यंत वाहन बंद ठेवा

(D) नेहमीच्या गतीने वाहन चालु ठेवा

36. मोटार वाहनाच्या काचा बाहेरून चकाकतील असे काही काचेवर बसविणे

(A) एकांत मिळत असल्याने आवश्यक आहे

(B) वाहनातील वातावरण थंड ठेवण्यासाठी चांगला पर्याय आहे

(C) हे कायद्याविरुद्ध असल्याने शिफारस केलेले नाही

(D) वाहन इतरांना माहिती व्हावे म्हणून आवश्यक आहे

---

SPACE FOR ROUGH WORK

37. तुम्ही चौकात गेल्यावर रहदारीमुळे रस्ता बंद असल्याचे लक्षात आल्यास
   (A) पुढच्या वाहनाला मागे टाकून पुढे जाण्याचा प्रयत्न करा
   (B) पुढील वाहनाच्या जास्तीत जास्त जवळ वाहन थांबवा
   (C) चौक पार करताना आहे त्याच लेन मधून हळूहळू पुढे जा
   (D) चौकात प्रवेश करण्यापूर्वीच थांबवा

38. चौकात प्रवेश करतांना हिरवा दिवा असतांना एखादी अंत्ययात्रा आडवी जात असेल तर
   (A) काळजीपूर्वक पुढे जा
   (B) अंत्ययात्रेतून जागा मिळेपर्यंत थांबा व मध्ये घुसून पुढे जा
   (C) संपूर्ण अंत्ययात्रा जाईपर्यंत थांबा व हिरवा दिवा असेल तेव्हा जा
   (D) हिरवा दिवा आहे. सरळ पुढे जा

39. चढणीवर वाहन उभे करून ठेवण्यापूर्वी
   (A) चाके सरळ रेषेत ठेवा
   (B) चाके कठड्याच्या दिशेने वळवा
   (C) चाके कठड्याच्या विरुद्ध दिशेने वळवा
   (D) फक्त हॅण्डब्रेक लावा

40. मोटार सायकल चालवतांना
   (A) वाहन व्यवस्थित चालावे म्हणून कार्ब्युरेटर व्यवस्थित ठेवावा
   (B) प्रत्येक वेळी रस्त्याची परिस्थिती जाणुन घ्यावी
   (C) वाहनावर योग्य ताबा राहण्यासाठी सतत पाहणी/तपासणी करावी
   (D) हवा, पेट्रोल आहे याची खात्री करावी

41. इंधनाची काळजीपूर्वक बचत केव्हा होईल ?
   (A) खालील गिअरमध्ये वाहन वेगात चालविल्यास
   (B) वाहने चांगली असल्यामुळे विचार करण्याची आवश्यकता नाही
   (C) वरच्या गिअरमध्ये वाहन वेगात चालविल्यास
   (D) वाहन योग्य गिअरमध्ये योग्य वेगाने चालविल्यास

42. दोन किंवा त्यापेक्षा अधिक मोटार सायकलस्वार जेव्हा एकाच वेळी प्रवास करीत असतील तेव्हा
   (A) रस्त्यावर स्पर्धा करण्यास हरकत नाही
   (B) वाहने समांतर रेषेत चालवावी
   (C) दोन वाहनात योग्य अंतर ठेवावे
   (D) सरळ रेषेत एकामागून एक वाहन चालवित न्यावे

43. वाहन चालकांना लायसन्स कशासाठी देण्यात येते ?
   (A) राज्यासाठी जास्त पैसा उपलब्ध करण्यासाठी
   (B) अधिकाऱ्यांना ओळख पटवून देण्यासाठी
   (C) धोकादायक वाहन चालकांना वाहन चालविण्यापासून मज्जाव करणेकरिता
   (D) ओळखपत्र असावे म्हणून

SPACE FOR ROUGH WORK

44. मोटार सायकल थांबविण्याच्या वेळी

(A) प्रथम मागील ब्रेक लावुन वेग मर्यादा आणावी व नंतर पुढील ब्रेक लावावे

(B) प्रथम पुढील ब्रेक लावावे. वेग मर्यादा कमी करावी व नंतर मागील ब्रेक लावावे

(C) पुढील व मागील ब्रेक एकाच वेळी लावावे

(D) कोणताही ब्रेक प्रथम लावला तरी चालेल

45. वाहनास गुळगुळीत टायर असतांना रस्त्यावर आणणे धोकादायक आहे कारण

(A) वाहनास रस्त्यावर पकड घेता येत नाही (B) रस्त्याची पकड जास्त येते

(C) वाहन चटकन धोकादायक वेग घेऊ शकते (D) नवीन टायरची विक्री कमी होते

46. जर तुमचे खाजगी वाहन 15 वर्षापेक्षा जुने असेल तर

(A) वाहनाची नोंदणी पुन्हा करून घेणे आवश्यक आहे (B) वाहनाचे इंजिन बदलणे आवश्यक आहे

(C) वाहन चालवितांना 50 किमी पेक्षा जास्त वेग वाढवू नये (D) रस्त्यावर ते वाहन चालविता येत नाही

47. अनियंत्रित रेल्वे मार्ग ओलांडतांना

(A) वाहन थांबवा व दोन्ही दिशांना पहा. रेल्वे येत नसल्याची खात्री करा

(B) तातडीने रेल्वेमार्ग ओलांडा

(C) वेगाने रेल्वेमार्ग ओलांडा

(D) रेल्वे येण्याची वाट पहा

48. शिकाऊ लायसन्स धारक व्यक्ति

(A) '**L**' चिन्ह लावलेले कुठलेही वाहन चालवू शकते

(B) शिकाऊ लायसन्समध्ये निर्देश दिलेले वाहन चालवू शकते

(C) पक्के लायसन्स धारकाच्या मार्गदर्शनाखाली वाहन चालवू शकते

(D) पक्के लायसन्स मिळेपर्यंत वाहन चालवू शकत नाही

49. सुरक्षिततेच्या दृष्टीने वहानाचे सुटे भाग नेहमी

(A) रस्त्यावरील कोणत्याही कारगिराकडून खरेदी करा

(B) स्वस्त दराने सुटे भाग देणाऱ्या दुकानातून खरेदी करा

(C) सुटे भाग विकणाऱ्या विक्रेत्याकडूनच खरेदी करा

(D) जुन्या वाहनातील सुटे भाग वापरून गरज पूर्ण करा

50. मोटार वाहन चालविण्याच्या लायसन्सवर कोणत्या परिस्थितीत नोंद घेतली जाते ?

(A) चालकाने कुशलतेने अपघात टाळल्यास (B) चालकाने काही गंभीर कृत्य केल्यास

(C) चालक जर दहा वर्षे सातत्याने वाहन चालवित असल्यास (D) चालकाचे वर्तन चांगले असल्यास

51. मोटार सायकल चालवितांना

(A) शिरस्त्राण (हेलमेट) घालणे फायद्याचे आहे (B) शिरस्त्राण घालणे तोट्याचे आहे

(C) हेलमेट घालणे त्रासाचे आहे (D) हेलमेट घालणे कायद्याने बंधनकारक आहे

**SPACE FOR ROUGH WORK**

52. वाहनाचे नोंदणी चिन्ह हे

(A) कोणत्या रंगात असू शकते
(B) विहीत रंगात परंतु कलात्मक असावे
(C) विहीत रंगात व मापातच असावे
(D) भडक रंगात असावे

53. रस्त्यावरील लाल दिवा म्हणजे

(A) थांबण्याचा इशारा
(B) हळु जाण्याचा इशारा
(C) पुढे जाण्याचा अधिकार असल्याचा इशारा
(D) अतिमहत्त्वाच्या व्यक्तिसाठी ओळखीची खूण

54. वाहन चालविताना एका मार्गिकेतून दुसऱ्या मार्गिकेत जाताना

(A) वळण घेण्याचा योग्य संकेत दर्शवावा
(B) हे कायद्याविरुद्ध आहे. दुसऱ्या मार्गिकेत प्रवेश करु नये
(C) सुरक्षितता पाहून व योग्य इशारा देवून दुसऱ्या मार्गिकेमध्ये प्रवेश करावा
(D) पुढील दिवे लावावे

55. चौकात किंवा रस्त्यावर पादचारी रस्ता पार करण्याचे (झेब्रा क्रॉसिंग) चिन्ह नसताना पादचारी रस्ता पार करीत असतील तेव्हा

(A) पादचारी निष्काळजीपणे चालत असल्याने काळजीपूर्वक जा
(B) पादचाऱ्यांना रस्ता पार करु द्या
(C) वेग कमी करून पादचाऱ्यांना इशारा द्या
(D) अशा ठिकाणी पादचाऱ्यांना रस्ता पार करु देऊ नका

56. उजव्या बाजूस वळण घेताना वाहन कोणत्या मार्गिकेमध्ये असलेच पाहिजे ?

(A) कोणत्याही मार्गिकेत
(B) अगदी डाव्या मार्गिकेत
(C) मधल्या मार्गिकेत
(D) अगदी उजव्या मार्गिकेत

57. पुढे जाणाऱ्या वाहनापासून आपले वाहन किती अंतरावर असावे हे कशावर अवलंबून आहे ?

(A) वेग, हवामान आणि रस्त्याची स्थिती
(B) कायदेशीर वेग मर्यादा
(C) वाहनाची यांत्रिक स्थिती
(D) रस्त्याची स्थिती

58. वाहन चालक स्वत:चे लायसन्स दुसऱ्या व्यक्तिला केव्हा वापरण्यास देऊ शकतो ?

(A) वाहन चालविण्यास शिकताना
(B) कधीही देऊ शकत नाही
(C) ओळखीसाठी
(D) कर्ज घेण्यासाठी

59. रहदारीच्या बाजूला वाहनांचा दरवाजा केव्हा उघडता येईल ?

(A) रहदारी नसताना
(B) वाहन पूर्णपणे थांबलेले असताना
(C) इतर वाहनांना थांबण्याचा इशारा दिल्यानंतर
(D) कधीही नाही

60. आपले वाहन चौकात प्रवेश करतेवेळी रहदारी नियंत्रक दिवा लाल प्रकाशत असेल व पोलिस जाण्याची खूण करत असताना

(A) हिरवा दिवा येण्याची वाट पहा आणि मगच जावा
(B) लाल दिव्याकडे पोलिसाचे लक्ष वेधा
(C) पोलिसाने दर्शविल्याप्रमाणे वागा
(D) काही प्रतिसाद देण्याची आवश्यकता नाही

---

**SPACE FOR ROUGH WORK**

61. रस्त्यावर रंगविलेला सलग दुहेरी पट्टा म्हणजे
   (A) पुढील वाहनाच्या पुढे जाताना मार्ग बदलू शकता
   (B) आपल्या पुढील वाहनास ओलांडण्यास बंदी आहे
   (C) पुढील वाहनाच्या पुढे जाताना दुहेरी पट्टा ओलांडू नका
   (D) रस्ता कळावा म्हणून काढलेला पट्टा आहे

62. वाहन चालविताना लाल, पिवळा, निळा दिवा दर्शविणारे वाहन आल्यास
   (A) रस्त्याच्या डाव्या बाजूला जा व आपल्या वाहनाचा वेग कमी करा
   (B) आपण जेथे आहात तेथेच थांबा
   (C) रस्त्याच्या डाव्या बाजूस जा व थांबा
   (D) आपल्या ठिकाणी वाहन चालवत राहा

63. ताशी 45 कि.मी. वेगाने जाताना तुमच्या पुढच्या वाहनात व तुमच्या वाहनात असावयाचे कमीत कमी अंतर किती ?
   (A) एक वाहनाइतके (B) दोन वाहनाइतके
   (C) तीन वाहनाइतके (D) चार वाहनाइतके

64. अपघातग्रस्त व्यक्तीने भरपाई अर्ज कोठे करावा ?
   (A) प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याकडे (B) अपघात दावा प्राधिकरणाकडे
   (C) वाहनाच्या बँकर व मालकाकडे (D) पोलिसाकडे

65. विमा पॉलिसी संपलेले वाहन चालविल्यानंतर त्या वाहनास अपघात झाल्यास नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी
   (A) शासनाची आहे (B) वाहन मालकाची आहे
   (C) विमा कंपनीची आहे (D) कुणाचीही नाही

66. मराठवाडा प्रादेशिक विभागात असणारे जिल्हे कोणते ?
   (A) जालना, परभणी, लातूर, औरंगाबाद (B) उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, बीड
   (C) उस्मानाबाद, हिंगोली, वाशिम, यवतमाळ (D) पर्याय (A) व (B) दोन्हीही

67. मराठवाड्यातील भौगोलिकदृष्ट्या क्षेत्रफळाने सर्वात लहान जिल्हा कोणता ?
   (A) औरंगाबाद (B) जालना (C) हिंगोली (D) बीड

68. औरंगाबाद जिल्ह्यात किती तालुके आहेत ?
   (A) 10 (B) 9 (C) 11 (D) 12

69. मराठवाड्यातील औष्णिक वीज केंद्र कोठे आहे ?
   (A) पैठण (B) पारस (C) परळी (D) परभणी

70. नांदेड व लातूर या जिल्ह्यात अनुक्रमे किती तालुके आहेत ?
   (A) 16, 10 (B) 15, 11 (C) 16, 9 (D) 15, 8

SPACE FOR ROUGH WORK

71. आदिवासींच्या वस्तीला ____________ म्हणतात व बंजाऱ्यांच्या (लमाण्यांच्या) वस्तीला ____________ म्हणतात.
(A) पाडा, तांडा (B) तांडा, पाडा (C) पाडा, वाडा (D) वाडा, तांडा

72. गोदावरी ही महाराष्ट्रातील प्रमुख नदी असून तिची महाराष्ट्रातील लांबी ____________ कि.मी. आहे.
(A) 568 (B) 668
(C) 768 (D) 1450

73. ताशी 60 कि.मी. सरासरी वेगाने गाडी चालविल्यास व प्रवासात 20 मिनिटे थांबल्यास 300 कि.मी. अंतर जाणेस किती वेळ लागेल ?
(A) 320 मिनिटे (B) 520 मिनिटे (C) 300 मिनिटे (D) यापैकी नाही

74. $105 \div 5 = ?$
(A) 21 (B) 525 (C) 110 (D) यापैकी नाही

75. $4 + 4 \times 2 = ?$
(A) 16 (B) 32 (C) 12 (D) यापैकी नाही

76. $335 + 12 - 11 = ?$
(A) 336 (B) 335 (C) 358 (D) यापैकी नाही

77. 12.345 या संख्येतील 2 व 3 च्या स्थानिक किंमतीतील फरक किती ?
(A) 1 (B) 2.3 (C) 1.7 (D) यापैकी नाही

78. 12.345 या संख्येतील 2 व 3 च्या स्थानिक किंमतीचा गुणाकार किती ?
(A) 6 (B) 0.6 (C) 6.6 (D) यापैकी नाही

79. 12.345 या संख्येतील 2 च्या स्थानिक किंमतीस 3 च्या स्थानिक किंमतीने भागल्यास
(A) 6 (B) 6.6 (C) 6.66... (D) यापैकी नाही

80. 12.345 या संख्येतील 3 व 4 च्या स्थानिक किंमतीतील फरक किती ?
(A) 0.26 (B) 0.16 (C) 0.36 (D) यापैकी नाही

81. पुढीलपैकी कोणत्या भाषेची लिपी देवनागरी नाही ?
(A) गुजराती (B) संस्कृत (C) तामिळ (D) हिंदी

82. मुलावर खोटे खोटे डोळे वटारणे ही बाब कशात येते ?
(A) कृत्रिम भाषा (B) नैसर्गिक भाषा (C) स्वाभाविक भाषा (D) पर्याय (A) व (B) बरोबर

83. अभिनय कला, नृत्यनाट्ये ही कोणत्या भाषेची उदाहरणे आहेत ?
(A) कृत्रिम भाषा (B) नैसर्गिक भाषा (C) पर्याय (A) व (B) बरोबर (D) यापैकी नाही

84. पुढीलपैकी जोडाक्षर ओळखा
(A) त् (B) व् (C) क्ष (D) क्ष्

SPACE FOR ROUGH WORK

85. पुढीलपैकी कोणते व्यंजन अनुनासिक नाही ?

(A) ङ् (B) म् (C) स (D) ण्

86. 'घंटा' या शब्याचे पर्यायी लिखाण निवडा

(A) घण्टा (B) घङ्टा (C) घन्टा (D) घंन्टां

87. ओठाचा एकमेकाशी किंवा जिभेचा कोणत्याही भागाचा मुखातील कोणत्याही अवयवाशी स्पर्श न होता मुखावाटे जे ध्वनी बाहेर पडतात त्यांना काय म्हणतात ?

(A) व्यंजन (B) स्वर (C) संधी (D) अनुस्वार

88. भाषा म्हणजे काय ?

(A) शब्द (B) बोलणे (C) ऐकणे (D) विचार व्यक्त करण्याचे साधन

89. पुढीलपैकी कोणता वर्ण दीर्घ स्वर नाही ?

(A) आ (B) इ (C) ई (D) ऊ

90. मराठी भाषेत लेखन कोणत्या लिपित केले जाते ?

(A) नागरी (B) मोडी (C) संस्कृत (D) देवनागरी

91. वाक्य म्हणजे काय ?

(A) अर्थपूर्ण अक्षरसमूह (B) अर्थपूर्ण शब्दसमूह

(C) शब्दाचे बदललेले रूप (D) क्रियापद रहित शब्दसमूह

92. खालीलपैकी अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

नुसती <u>फुशारकी</u> काय कामाची ?

(A) सामान्यनाम (B) विशेषण

(C) भाववाचक नाम (D) धातुसाधित नाम

93. 'हुशारी' हा शब्द नामाच्या कोणत्या प्रकारात मोडतो ?

(A) सामान्यनाम (B) विशेषण

(C) भाववाचक नाम (D) धातुसाधित नाम

94. खालीलपैकी अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

हे <u>दूध</u> खूप चविष्ट आहे.

(A) धातुसाधित नाम (B) विशेषण (C) सामान्यनाम (D) सर्वनाम

95. खालीलपैकी अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

उत्तरेकडे <u>हिमालय</u> पर्वत आहे.

(A) सर्वनाम (B) विशेषनाम (C) धातुसाधित नाम (D) क्रियापद

**SPACE FOR ROUGH WORK**

96. खालीलपैकी विशेषनाम नसलेला शब्द कोणता ?

(A) सुरेश (B) गंगा (C) गाय (D) भारत

97. खालीलपैकी विशेषनाम असलेला शब्द कोणता ?

(A) सरस्वती (B) नवलाई
(C) वाघ (D) महासागर

98. वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या शब्दाला काय म्हणतात ?

(A) विशेषण (B) क्रियापद
(C) सर्वनाम (D) नाम

99. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

राधाचे नविन खेळणे मोडले.

(A) सकर्मक क्रियापद (B) अकर्मक क्रियापद
(C) द्विकर्मक क्रियापद (D) संयुक्त क्रियापद

100. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

अंजलीने रामायण वाचले.

(A) सकर्मक क्रियापद (B) अकर्मक क्रियापद
(C) उभवयविध क्रियापद (D) यापैकी नाही

101. 'लवकर' शब्दाची जात कोणती ?

(A) क्रियाविशेषण (B) उभयान्वयी अव्यय
(C) क्रियापद (D) यापैकी नाही

102. 'तू नोकरीला लागला नाहीतर आपली आर्थिक स्थिती ढासळेल' यातील उभयान्वयी शब्द शोधा.

(A) तू (B) नोकरी
(C) आर्थिक स्थिती (D) नाहीतर

103. प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे ते ओळखा ?

मनुष्याने लोभ धरु नये.

(A) द्वितीया (B) तृतीया
(C) चतुर्थी (D) पंचमी

104. प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे ते ओळखा ?

अमेरिकेहून माझा मामेभाऊ आला आहे.

(A) द्वितीया (B) तृतीया (C) षष्टी (D) पंचमी

**SPACE FOR ROUGH WORK**

105. अधोरेखित शब्दाचे विभक्ती अर्थ ओळखा.

<u>कार्यालयात</u> नियमित व वेळेवर यावे.

(A) कर्ता (B) करण (C) अधिकरण (D) संबंध

106. श्रीचक्रधर स्वामी ________ धारण करून महाराष्ट्रात आले.

(A) शांतवृत्ती (B) संयमीवृत्ती (C) वैराग्यवृत्ती (D) यापैकी नाही

107. महानुभव पंथाची स्थापना ________ यांनी केली.

(A) ज्ञानेश्वर (B) श्रीचक्रधरस्वामी

(C) समर्थ रामदास (D) तुकाराम महाराज

108. संत नामदेव ________ निस्सीम भक्त होते.

(A) विठ्ठलाचे (B) रामाचे (C) हनुमानाचे (D) कृष्णाचे

109. संत ज्ञानेश्वरांचा जन्म सन् ________ मध्ये झाला.

(A) 1265 (B) 1270 (C) 1275 (D) यापैकी नाही

110. संत एकनाथांनी ________ प्रसार केला.

(A) ज्ञानमार्गाचा (B) भक्तिमार्गाचा (C) कर्ममार्गाचा (D) यापैकी नाही

111. समर्थ रामदासांचा जन्म ________ दिवशी झाला.

(A) विजयादशमी (B) रामनवमी (C) कृष्णाष्टमी (D) एकादशी

112. समर्थ रामदासांनी लोकांना ________ उपासना करण्यास शिकविले.

(A) विठ्ठलाची (B) देवीची (C) रामाची (D) शक्तीची

113. 'आपण दुःखी कष्टी झाल्यावर जगाचे कल्याण कोण करील' ही शिकवण कोणाची आहे ?

(A) मुक्ताबाई (B) संत ज्ञानेश्वर (C) संत तुकाराम (D) समर्थ रामदास

114. संतांनी लोकांच्या मनात ________ निर्माण केला.

(A) आदरभाव (B) भक्तिभाव (C) राष्ट्राभिमान (D) यापैकी नाही

115. जिजामाता ही सिंधखेडच्या ________ मुलगी होती.

(A) लखुजीराव जाधवांची (B) लखुजीराव भोसल्यांची

(C) मालोजी भोसल्यांची (D) निंबाळकरांची

116. महाराष्ट्रात ________ लेण्याजवळ घृष्णेश्वरांचे सुंदर मंदिर आहे.

(A) अजिंठा (B) वरूळ (C) घारापुरी (D) यापैकी नाही

117. उत्तरेच्या मुघल बादशहाने स्वारी केली त्यावेळी ________ ही निजामशाहची राजधानी होती.

(A) अहमदनगर (B) सिंधखेड (C) वेरूळ (D) दौलताबाद

SPACE FOR ROUGH WORK

118. निजामशाहचा ................ हा कर्तबगार वजीर होता.
   (A) मलिक अंबर
   (B) फत्तेखान
   (C) शरिफजी
   (D) यापैकी नाही

119. शिवनेरी किल्ल्याचा किल्लेदार ................ याने जिजाबाईच्या रक्षणाची जबाबदारी स्विकारली.
   (A) दादोजी कोंडदेव
   (B) फिरंगोजी नरसाळा
   (C) विजयराज
   (D) यापैकी नाही

120. शिवरायांचा जन्म ................ किल्ल्यावर झाला.
   (A) पुरंदर
   (B) शिवनेरी
   (C) पन्हाळा
   (D) प्रतापगड

121. मुघलांच्या सेवेत दाखल झाल्यानंतर मुघल बादशहा ................ याने शहाजीराजांना आपली सरदारकी बहाल केली.
   (A) औरंगजेब
   (B) शाहजहान
   (C) जहांगीर
   (D) यापैकी नाही

122. शहाजीराजे ................ गाढे पंडित होते.
   (A) संस्कृतचे
   (B) कन्नडचे
   (C) तामिळचे
   (D) यापैकी नाही

123. दादोजी कोंडदेव हे ................ सुभेदार होते.
   (A) पुरंदरचे
   (B) शिवनेरीचे
   (C) कोंढाण्याचे
   (D) रायगडचे

124. मावळात राहणाऱ्या लोकांना ................ म्हणतात.
   (A) शेतकरी
   (B) सैनिक
   (C) मावळे
   (D) यापैकी नाही

125. शिवाजीराजे व सईबाई यांचा विवाह पुण्याच्या ................ मोठ्या थाटामाटाने साजरा झाला.
   (A) शनिवार वाड्यात
   (B) लालमहालात
   (C) विश्रामबाग वाड्यात
   (D) यापैकी नाही

126. शिवबा आणि त्यांच्या सवंगड्यांनी ................ साली रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्याची शपथ घेतली.
   (A) 1640
   (B) 1645
   (C) 1650
   (D) यापैकी नाही

127. शिवरायांची स्वतंत्र राजमुद्रा ................ तयार केली.
   (A) जिजाऊंनी
   (B) शहाजीराजांनी
   (C) दादोजी कोंडदेवांनी
   (D) मावळ्यांनी

128. शिवरायांच्या काळात बहुदा राजमुद्रा ................ भाषेत असत.
   (A) अरबी
   (B) फारसी
   (C) उर्दू
   (D) यापैकी नाही

129. शिवरायांची राजमुद्रा ................ भाषेत होती.
   (A) अरबी
   (B) फारसी
   (C) मराठी
   (D) संस्कृत

130. तोरणा किल्ल्यावर सापडलेले धन ................ कामी आले.
   (A) सैन्याच्या
   (B) राजवाड्याच्या
   (C) स्वराज्याच्या
   (D) यापैकी नाही

**SPACE FOR ROUGH WORK**

131. शिवरायांच्या स्वराज्याची पहिली राजधानी __________ ही सजली.

(A) रायगड
(B) राजगड
(C) प्रतापगड
(D) यापैकी नाही

132. अफजलखान बारा वर्षे __________ सुभेदार होता.

(A) पुण्याचा
(B) वाईचा
(C) कोल्हापुरचा
(D) सातार्‍याचा

133. बाजीप्रभू देशपांडे __________ धारातीर्थी पडले.

(A) वतनासाठी
(B) सरदारकीसाठी
(C) स्वराज्यासाठी
(D) यापैकी नाही

134. अफजलखानाच्या वधानंतर शिवरायांनी विजापुरकरांच्या ताब्यातील __________ जिंकला.

(A) पन्हाळगड
(B) विशालगड
(C) प्रतापगड
(D) यापैकी नाही

135. शिवराय __________ शब्दावर विश्वास ठेवून आग्र्यास बादशहाच्या भेटीस गेले.

(A) दिलेरखानाच्या
(B) शायिस्तेखानाच्या
(C) जसवंतसिंगच्या
(D) यापैकी नाही

136. आग्र्याहून येताना शिवाजीराजांनी संभाजीराजांना __________ एका सुरक्षित ठिकाणी ठेवले.

(A) झाशीत
(B) मथुरेत
(C) ग्वालियरमध्ये
(D) यापैकी नाही

137. कुतुबशाहची __________ ही राजधानी होती.

(A) दिल्ली
(B) जिंजी
(C) गोवळकोंडा
(D) यापैकी नाही

138. शिवाजीराजे धर्म, जात न पाहता माणसाची __________ पाहून त्यास नोकरीवर ठेवत.

(A) आर्थिक स्थिती
(B) हुशारी
(C) योग्यता
(D) यापैकी नाही

139. धारदार वस्तु चुकीच्या पद्धतीने हाताळल्यास आपल्याला __________ होवू शकते.

(A) घात (B) आनंद (C) दुःख (D) इजा

140. परवा पंचगंगेच्या पुलावरून पळता पळता पुष्पा परशुराम पळस्पे पाण्यात पडली है पाहताच पोलिस पुष्पाच्या दिशेन पळाले. या वाक्यात 'प' हे अक्षर किती वेळा आले आहे ?

(A) सतरा वेळा
(B) चौदा वेळा
(C) पंधरा वेळा
(D) सोळा वेळा

SPACE FOR ROUGH WORK

141. 2, 4, 5, 4, 3, 4, 2, 4, 7, 4, 8, 4, 8, 4, 2, 4

वरील अंकमालिकेत आठ वेळा आलेला अंक कोणता ?

(A) 3 (B) 2 (C) 4 (D) 5

142. खाली दिलेल्या संख्यापैकी सर्वात मोठ्या संख्येतील अंकाची बेरीज किती येईल ?

37, 49, 52, 45, 44

(A) 7 (B) 10 (C) 13 (D) 9

143. संख्यामाला 5556, 4445, 2223, 1112, 3334

वरील संख्यामालेतील संख्या क्रमाने लावल्यास मध्यभागी कोणती संख्या येईल ?

(A) 1112 (B) 3334 (C) 4445 (D) 2223

144. खालीलपैकी किती मूळ संख्यांच्या अंकांच्या जागेत अदलाबदल केल्यास येणाऱ्या संख्याही मूळ संख्याच असतील ?

13, 17, 61, 23, 31

(A) एक (B) चार (C) तीन (D) दोन

145. 1 ते 50 पर्यंत असणाऱ्या किती दोन अंकी मूळ संख्यामध्ये 3 हा अंक एककस्थानी आला आहे ?

(A) पाच (B) तीन (C) चार (D) दोन

146. 1 ते 50 पर्यंत असणाऱ्या किती दोन अंकी मूळ संख्यामध्ये 3 हा अंक दशमस्थानी आला आहे ?

(A) पाच (B) तीन (C) चार (D) दोन

147. 7, 0, 1 यातील 0 पुन्हा पुन्हा वापरून तयार होणाऱ्या सर्वात मोठ्या व सर्वात लहान चार अंकी संख्यामध्ये फरक किती ?

(A) 6930 (B) 6039 (C) 6093 (D) 6309

148. गटात न बसणारा शब्द ओळखा.

(A) मटकी (B) गहू

(C) ज्वारी (D) बाजरी

149. गटात न बसणारा शब्द ओळखा.

(A) वाटाणा (B) चवळी

(C) भोपळा (D) मूग

150. गटात न बसणारा शब्द ओळखा.

(A) नाग (B) सर्प

(C) फुरसे (D) फुलपाखरु

151. गटात न बसणारा शब्द ओळखा.

(A) सनई (B) बासरी (C) तंबोरा (D) तुतारी

SPACE FOR ROUGH WORK

152. गटात न बसणारी संख्या ओळखा.

(A) 3 (B) 11 (C) 17 (D) 21

153. गटात न बसणारी संख्या ओळखा.

(A) $\frac{5}{10}$ (B) $\frac{7}{14}$ (C) $\frac{2}{5}$ (D) $\frac{3}{6}$

154. गटात न बसणारी संख्या ओळखा.

(A) 14835 (B) 8792 (C) 9211 (D) 5722

155. गटात न बसणारी संख्या ओळखा.

(A) 3.7 (B) 5.5 (C) 8.2 (D) 6.4

156. संख्या मालेतील प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या ओळखा.

7, 10, 13, 16, ?

(A) 19 (B) 12 (C) 18 (D) 20

157. संख्या मालेतील प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या ओळखा.

504, 605, 706, 807, ?

(A) 709 (B) 809 (C) 907 (D) 908

158. संख्या मालेतील प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या ओळखा.

$\frac{4}{9}, \frac{4}{8}, \frac{4}{7}, ?, \frac{4}{5}$

(A) $\frac{5}{9}$ (B) $\frac{3}{6}$ (C) $\frac{4}{6}$ (D) $\frac{4}{10}$

159. पावणे तीन वाजता मिनिट काटा कितीवर असेल ?

(A) 10 वर (B) 9 वर (C) 3 वर (D) 8 वर

160. घड्याळाचा तासकाटा व मिनिटकाटा एकावर एक असे किती वाजता असतील ?

(A) बारा वाजता (B) अकरा वाजता

(C) सहा वाजता (D) एक वाजता

SPACE FOR ROUGH WORK